**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**

इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in

मो.क्र.9819208279

**प्रेसनोट** **दिनांक २०.१२.२०२४**

## ‘‘सन २०१४ मध्ये विनयभंग करणा-या छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा, ठाणे येथील डॉक्टर आरोपी यास तीन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा’’

सन २०१४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय, कळवा, ठाणे येथे डॉक्टर शैलेश्वर नटराजन, वय ६३ वर्षे हे प्राध्यापक व शैल्यचिकीत्सा विभागाचे प्रमुख असताना त्यांनी एम.बी.बी.एस.च्या महिला प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देत असताना प्रशिक्षणार्थी मुलींशी जवळीक साधुन त्यांची लैंगिक सतावणूक करून विनयभंग केला होता. त्याबाबत आरोपीविरूध्द कळवा पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ३५०/२०१४ भारतीय दंड संहिता कायदा कलम ३५४ (A), ५०९ प्रमाणे गुन्हा दाखल होता. सदर गुन्हयाच्या तपासात तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक/श्री.मुरलीधर कारकर व त्यांचे तपास पथकाने भक्कम पुरावे गोळा करून आरोपी विरूध्द मा. न्यायालयात दोषारोपपत्र सादर केले होते.

सदर गुन्हयाची सुनावणी मा.श्रीमती मोहिनी ननावरे, न्यायाधीश, ४ थे न्यायालय, ठाणे यांनी घेवुन विनयभंगाच्या गुन्हयातील आरोपी शैलेश्वर नटराजन यास भारतीय दंड संहिता कायदा कलम ३५४ (A), ५०९ प्रमाणे दोषी ठरवुन तीन वर्ष सक्त मजुरी व ५०९ साठी १ वर्ष साधी कैद व ५० हजार रूपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सदर विनयभंगाच्या गुन्हयाच्या संदर्भात सरकारच्या वतीने सरकारी अभियोक्त्या मा.श्रीमती लीना पेडणेकर मॅडम, तत्कालीन तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक/श्री.मुरलीधर कारकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.अशोक उत्तेकर, पोहवा/डी.एच.जाधव, पोलीस अंमलदार/बिन्नर यांनी अथक परिश्रम करून मा. न्यायालयात ठोस पुरावे सादर केले व त्यामुळे उपरोक्त गुन्हयातील आरोपीला दोषी ठरविण्यात यश आल्यामुळे सदर उत्कृष्ठ कामगिरीबाबत पोलीस दलात व समाजातील सर्व स्तरातुन पोलीसांचे कौतुक होत आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर